भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.६०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०१/२०१७

**१) ओमसत्यसाई कॉलेजमधील सामानाची चोरी . :–**

दिनांक २३/०१/२०१७ ते २४/०१/२०१७ चे रात्र. दरम्यान यातील फिर्यादी दिलीप काशीनाथजी पाटील वय ४६ वर्ष, रा. प्राचार्य ओमसत्यसाई कॉलेज परसोडी हा कर्तव्यावर असलेल्या ओमसत्यसाई कॉलेज मधील कार्यालय व प्राध्यापक कक्षाचे समोरील दाराचे कोणीतरी अज्ञात चोराने कुलुप तोडुन आत प्रवेश करुन किबोर्ड मधील चाब्या काढुन गोदरेज आलमारी मधील एमप्लीफायर आहुजा माईक १ व चायनल लीड एकुण कि. १५,०००/–रु. चा माल कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५७, ३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलगी घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद. : –**

दिनांक २४/०१/२०१७ चे ०८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही शाळेत जाते म्हणुन घरुन निघुन गेली घरी परत आली नाही तिचा रिश्तेदारीत शोध घेतला असता मिळुन आली नाही तिला कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेल्याचा संशय व्यक्त केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन खिशातील मोबाईलची चोरी . : –**

दिनांक २४/०१/२०१७ चे १६.३० ते १७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी आनंद शिवराम बिसने वय ४२ वर्ष, रा. जगनाडे वार्ड तुमसर हा बाजारात भाजीपाला घेत असतांना यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन त्याचे खिशातील मायक्रोमॅक्स कंपनीचा मोबाईल कि. १२,००/–रु. चा चोरी करुन पळत असतांनी त्यास लोकांनी पकडल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. श्रीवास पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) महीलेवर अत्याचार करुन जिवाने ठार मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . : –**

दिनांक २३/०१/२०१७ चे २०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही आपल्या घरी किंचन मध्ये स्वयपांक करीत असतांना आरोपी क्र. १ ने घराच्या मागील दारातुन आत प्रवेश करुन फिर्यादीस कवटाळुन आरोपी क्र. २ यास बोलावले. व त्यास मोबाईल मध्ये फोटो घेण्यास लावले नंतर आरोपी क्र. २ ला बाहेर काढुन फिर्यादी व तिचे मुलीस जिवानिशी ठार मारण्याची धमकी देवुन बळजबरीने फिर्यादीवर अत्याचार केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७६,४५२,१०९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. कुंभरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**५) अवैध दारू /जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक २४/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. मोहाडी, कारधा, वरठी, तुमसर, सिहोरा, आंधळगाव, गोबरवाही, पवनी, जवाहरनगर, व लाखांदुर येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५५लिटर हातभट्टी दारु + कि. १,०५९०/–रु. व ०१ लिटर ८० मिलीलीटर देशी दारू कि. ३,०० /–रू तसेच जुगारातुन कि. ७६७ /–रू असा एकुण ११,६५७/–रू चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.